# इहवादी सम्यक परंपरेचा विमुक्त श्रमण : संत गाडगेबाबा

– प्रा. मनिषा डोंगरे

संत हा शब्द 'सत' या पालि शब्दापासुन तयार झाला . सत शब्दाचा प्रचार सेंट या रुपात ख्रिश्चन युगात पश्चिमेकडे झाला . तेथुन ख्रिस्ती फादर करता ' सेंट ' शब्द वापरण्यात येऊ लागला व तो शब्द परत ' संत ' या रूपाने भारतात पंधराव्या शतकात रूढ झाला . भक्ती परंपरेतील विभुतींना संत ही पदवी लावण्यात आली . मुळात भक्ति परंपरा भारतात चालू झाली ती महायान बौद्धमार्गातुन आचार्य . अश्वघोषांच्या प्रभावाने . नंतर विकसीत होत ती समाजापासुन तुटत गेली .याला अपवाद कबीर , तुकाराम आणि गाडगेबाबा . कबीर जेथे जन्मले ते ठिकाण नास्तिक दर्शनाचे केंद्र राहिलेले आहे . साहाजिकच कबीरांवर बुद्धमार्गाची छाप होती . त्या कबीरांचा प्रभाव गाडगेबांबावर होताच . त्याप्रमाणेच तुकाराम यांच्या शिष्येने आचार्य अश्वघोष यांचा वज्रसूची ग्रंथ मराठीत आणला .त्यातुन तुकारामांचे विचार प्रभावित झाले .गाडगेबाबा तुकारामांच्या विचाराने प्रेरित होते . एकंदर जो कल आहे तो भक्तीमार्गाच्या आत राहुन नास्तीक दर्शन जे इहवादी आहे ते प्रचारित करण्याचा दीसते . सरळ मार्गाने लोकांना दैववादातून काढणे कठीण असल्यानेच कबीरांचा राम , तुकयाचा विठ्ठल , डेबुजींचा गोपाला प्रती असणारा भक्तिभाव हा नाम मात्र होता .

गाडगेबाबा यांच जीवनचरित्र पाहिले तर ते भक्तिपंथाचे संत कवी आणि विमुक्त श्रमणच जास्त वाटतात . चरिथ भीक्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकानुकंपाय या बुद्धाने भिक्खू संघाला केलेल्या उपदेशाच पालन गाडगेबाबांनी केले . जनहित सुखासाठी गावोगाव चारिका केली . खापराच्या भिक्षापात्रात दिवसातुन एकदाच जेवण, चिंध्यांचे वस्त्र (आरंभिक काळात भिक्खुंचे चिवर चिंध्याचेच असायचे) एका गावात एका दिवसापेक्षा जास्त काळ राहत नसत हे सगळे विनय गाडगेबाबा पाळायचे ज्यांनी कधी विनयपिटक अभ्यासलेले देखिल नव्हते . गाडगेबाबांची परंपरा कोठली ? निश्चितच ते श्रमण परंपरेचे वारस होते . सर्वसंग परीत्याग करून ब्रम्हचर्यव्रत त्यांनी धारण केले तो नक्कीच योगायोग नाही . लोकांना नरक , स्वर्ग, चमत्कार वगैरेत अडकवुन भक्त बनवले नाही . विज्ञानवादि तर्कनिष्ठ बनवले . श्रमण परंपरेचे ते लक्षण आहे . अशा

विमुक्त श्रमणासोबत प्रज्ञासूर्य बोधिसत्वाची आंतरीक मैत्री सर्वश्रुत आहे आणि म्हणून ते सहपथिक होते .

इहवाद म्हणजे भौतिकवाद. ईश्वरवादाला नकार हा इहवादाचा एक भाग . गाडगेबाबा इहवादीच होते , या धरतीवर जीवंत माणसांच्या गरिबी , अज्ञान आणि लाचारीला मिटवुन ऐहिक जीवन संपन्न बनवण्याची दशसुत्री त्यांनी दिली. भुकेलेल्यांना अन्न , तहाणलेल्यांना पाणी , निरक्षरांना शिक्षण .यात कोठेच पारलौकिक पाप–पुण्य संकल्पना नाही . मानवतेच्या नात्याने बंधुता जपत समतेकडे जाणारी पायवाट त्यांनी दिली . अस्पृश्यतेचे चटके काय असते हे अनुभवण्याकरता उच्च लोकांनच्या पंगतीत जावुन आपली ओळख अस्पृश्य अशी सांगितली . अन्न वाढायची विनंती तेथे केली . घरातुन शिळी भाकरी त्यांना भेटली . पंगत मात्र पुरणपोळीची चालु होती . गाडगेबाबांनीं मुद्दाम भाकर नाकारुन पुरणपोळी चा हट्ट केला . त्या बदल्यात त्यांना चिलाटिच्या काटीने मारुन रक्तबंबाळ केले गेले . त्यांनी अस्पृश्य जातीत जन्म घेतला नव्हता पण अस्पृश्यतेचे दुःख काय असते हे अनुभवण्याकरता यातना सहन केल्या , किती ही करुणा ! विनम्रता इतकी की ते सत्कार सुध्दा स्विकारत नसत . गाडगेबाबा खाली बसुन भाषण ऐकताना पाहुन डॉ. आंबेडकरांना राहवलं नाही .त्यांना स्टेज वर बोलावलं पण त्यांनी उत्तर दिले की, बाप्पा बाबासायबाच्या बराबरिन बसाची माही लायकी नाही मी खालीच बरा ते ऐकुन स्टेज वरचे सार्व लोक खाली आले आणि एकटे बाबासाहेब स्टेज वर होते . इतकी विनयशिलता ? ती साधारण बाब नाही . अर्हत पदाला पोचलेला श्रमणच इतका विनम्र असु शकतो.

आधुनिक प्राचीन हा वादच मुळात गाडगेबाबांकरता थिटा पडतो . ते कालसंगत विमुक्त श्रमण होते . बुद्धाच्या विनयपिटकातिल भिख्खुची चारिका ज्यांनी स्विकारली जी प्राचीन भारतातील 'अरिय ' म्हणजे श्रेष्ठ लोकांची आचार संहिता होती .त्याबरोबरच समाजोपयोगी कार्य करताना शाळा, धर्मशाळा, छात्रावास, अन्नछत्रे, अनाथालये उघडुन त्यांचा पै अन पै चा हिशेब त्यांना तोंडपाठ होता .व्यावहारिक बाबतित ते हयगय करत नव्हते . निरक्षर होते, अनाडी नाही . नशा , कर्मकांड , जीवहिंसा , फिजूल खर्ची याबद्दल त्यांना विशेष तिटकारा वाटे . अगदी लहान असताना माझ्यामुळे त्यांचे घर–दार बरबाद झाले . शेती गहाण होती .निरक्षरता , देवधर्म आणि नशेमुळे जे जे दुःख सहन करावे लागले ते प्रत्यक्ष अनुभवले आणि बंड केले . सांसारिक जीवनात असताना पण त्यांनी जातियता ,शाहुकारी , ब्राम्हणवादाविरुद्ध कठोर संघर्षच केला . इतका संघर्ष कुठल्या संताच्या वाट्याला आला नसेल . त्यांच तत्वज्ञान हे अनुभववादी होत, साक्षात्कारी नाही . याकरताच ते काळाच्या बंधनाला भेदणारे

संत ठरतात . आधुनिकता प्राचीनता या संकल्पना त्यांना लावता येतच नाही .कबीर , तुकाराम , गाडगेबाबा यांना कालाचे बंधन नाहीच .

गाडगेबाबा यांच्या बद्दल आजपर्यंत जे लिखाण झालं ज्या चित्रपट, मालिका तयार केल्या गेल्या त्यात एक विशिष्ट दृष्टिकोण दिसुन येतो .सांस्कृतिक वर्चस्ववाद्यांनी त्यांना आध्यात्मिक संताच्या रांगेत बसवुन टाकल , तर वाम पंथी विचारधारावाल्यांनी समाजवादी संत अशी मांडणी केली .पण ती ओढुन ताणुन संबंध नसताना जोडलेली कडी मात्र आहे , भारतीय परिप्रेक्षातून विचार केला तर गाडगेबाबा यापेक्षा कितीतरी वेगळे ठरतात .त्यांची वैचारिक बैठक आध्यात्मिक नाही .या अर्थाने ते इतर दैववादी संताच्या रांगेत बसत नाहीत .तसेच समाजवाद संकल्पनेसोबत निरक्षर गाडगेबाबांचा परिचय नसल्याने तो तर्क पण चुकीचाच ठरतो . उरते काय ? भारतीय श्रमण परंपरेचे नास्तिक दर्शन . जे की त्यांच्यापर्यंत एखाद्या भटक्या श्रमणाकडुनच आले असेल . गो . निं . दांडेकर लिखित गाडगेबाबांच्या चरित्रात असा एक प्रसंग आहे .एका अनामिक साधु सोबत घडलेला सहवास त्यांच्या वैराग्यजीवनाला दिशा देणारा ठरला असे दिसुन येते . नक्कीच तो साधु भक्तिपंथि संतपरंपरेतील नसुन श्रमण परंपरेचाच असावा .शिवाय कबीर तुकारामांचे अभंग , दोहे गाडगेबाबा प्रवचनात वापरतांना दिसतात हे स्पष्ट आहे.

**संदर्भ साहित्य –**


१. कबिराचे संपूर्ण साहित्य
२. ज्ञानेश्वरी , तथा १६ व्या शतकापुर्वीचे समग्र संत वाङ्मय
३. संतशिरोमणी गाडगेबाबा : गो. नि. दांडेकर
४. विनयपिटक


ௐ